# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

---

दिनांक २०.०९.२०२६ रविवार

(कामगिरी)

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १९.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०९ केसेसमध्ये १० ईसमावर कारवाई करून एकुण १२,३६,८५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०५ केसेसमध्ये १६ इसमांवर कारवाई करून एकुण १,३६,०१७/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १४७५ केसेस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये १७ केसेस, ओव्हरस्पिडींग बाबत कलम ११२/१८३ मोवाका अन्वये ४८ केसेस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये २२ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये ४१ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये १३१ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये २९ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४ए मोवाका अन्वये २० केसेस, ड्रायव्हींग विदाऊन युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ०१ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ३६ केसेस, बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०३ केसेस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये ०७ केसेस, विटाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४बी(१) मोवाका अन्वये ०६ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे ०४ केसेस, व इतर कलमांखालील गुन्हे असे एकुण १,९१९ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ३,८४,६५०/—रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

**दिनांक १९.०९.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २०.०९.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०२ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे**.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा, युनिट क्र. ३ पोलीसांची कामगिरी :— जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १९.०९.२०२६ चे १७.३० वा. चे १८.४५ वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा, युनिट ०३ पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे कोतवाली हद्दीत, वार्ड क्र. १८, शिवाजीनगर, घर क्र. ९३३/ए/१५७, नागपूर येथे राहणारा आरोपी मधुकर कांबळे याचे राहते घरी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, नमुद ठिकाणी आरोपी क्र. १) मधुकर नत्थुजी कांबळे वय ५३ वर्ष रा. शिवाजीनगर, कोतवाली, २) मंगेश रघुनाथ गिरीपुंजे वय ३४ वर्षे, रा. गरोबा मैदान, नागपुर ३) पवन दिलीप रेवतकर वय ३४ वर्षे, रा. नंदनवन ४) प्रमोद रामचंद्र हरडे वय ६२ वर्षे, रा. चिटणीसपुरा महाल ५) राहुल शंकरराव ठाकरे वय

३२ वर्षे, रा. शिवाजीनगर, नागपूर ६) भुषण अशोकराव साळवे वय ५३ वर्षे, रा. शिवाजी नगर ७) योगेश शरद कायरकर वय ४७ वर्षे, रा. भोसला वेद शाळेजवळ, कोतवाली ८) राजेश जागोजी क्षिरसागर वय ५३ वर्षे, रा. किरणे हनुमान मंदीरजवळ, कोतवाली ९) देविदास भैयाजा ठवरे वय ५४ वर्षे, रा. भुतेश्वर नगर, १०) आशिष कैलास उईके वय २३ वर्षे, रा. गोंडपुरा, झेंडाचौक महाल ११) हेमंत उदारामजी भाटे वय ३५ वर्षे, रा. मिलन पानठेला, जगनाडे चौक १२) कुणाल कवडुजी हटवार वय २६ वर्षे, रा. शिवाजीनगर हे ताश पत्यावर पैश्यांची बाजी लावुन हार–जीतचा जुगार खेळतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन डावावरुन रोख ५१,१६०/–रू., वेगवेगळ्या कंपनीचे १२ मोबाईल फोन, ताश पत्ते व ईतर साहित्य असा एकुण २,३१,२१०/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे कोतवाली येथे कलम ४, ५ महा. जुगार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपींना मुद्देमालासह कोतवाली पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास कोतवाली पोलीस करीत आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. अतुल मोहनकर, सपोनि. संतोष बोयणे, पोउपनि. वैभव गुंजाळ, सफौ. ईश्वर खोरडे, पोहवा. अजय पाटील, विजय श्रीवास, दिनेश डवरे पोअं. विवेक भोयर, जितेश रेड्डी, योगेश्वर गायकवाड, राकेश नेहारे, सागर कोकाटे, विजय महारनगर, चंद्रशेखर डेकाटे, प्रमोद देशभ्रतार यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे प्रतापनगर :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १५.०९.२०२६ चे १९.३० वा. ते २०.०० वा. चे दरम्यान, फिर्यादीचे मोठे भाऊ नामे प्रशांत वसंत देशकर वय ६२ वर्ष रा. १०५, शिवप्रिया अपार्टमेंट, जयताळा बसस्टॉप जवळ, नागपूर हे त्यांचे चेतक बजाज दुचाकी क्र. एमएच ३१ एफझेड ७३६४ ने घरगुती मेसचे टिफीन वाटप करण्याकरीता जात असता, पोलीस ठाणे प्रतापनगर हद्दीत, खामलाकडे जाणारा रोड, एनआयटी कॉम्प्लेक्स समोर, कोणीतरी अज्ञात वाहनाचे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे भावाचे दुचाकीला धडक देवुन, पळुन गेला. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना उपचाराकरीता प्रथम पडोळे हॉस्पिटल व तेथून ऐरीस हॉस्पीटल, रामदासपेठ येथे दाखल केले होते. तेथून दिनांक १९.०९.२९२६ रोजी मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, उपचारादरम्यान ०८.२५ वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी हेमंत वसंत देशकर वय ६० वर्ष, रा. धनोडी ता. चांदुर रेल्वे जि. अमरावती यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे प्रतापनगर येथे पोउपनि साईनाथ काकरवाल ९७६६४९६३६३ यांनी अज्ञात वाहन चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं., सहकलम १८७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे सिताबर्डी :– फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी मोहन माधव क्षिरसागर वय ३० वर्षे, रा. मुंबई हे स्टॅन्डर्ड चार्टर्ड बॅक मॅनेजर लिगल म्हणून कार्यरत आहेत. दिनांक ३०.०४.२०२२ ते १३.०५.२०२२ चे दरम्यान, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्यीत, स्टॅन्डर्ड चार्टर्ड बॅक, शाखा, भास्कर कॉम्प्लेक्स, एमएलए होस्टेलजवळ, सिव्हील लाईन येथे आरोपी १) देवेंद्र पुणेकर, २) नितीन पुणेकर ३) महेंद्र पुणेकर ४) धमेंद्र पुणेकर सर्व रा. घर क्र. ३८, ८१, प्लॉट क्र. ३३२१, कोष्टीपुरा, हनुमान मंदीर गल्ली रोड, सिताबर्डी, नागपूर ५) नितीन कडू रा. प्लॉट क्र. ५३, ठवकर वाडी, भंडारा रोड, पारडी, नागपूर यातील आरोपी क्र. १ ते ४ यांनी आरोपी क्र. ५ बॅक सेल्स कर्मचारी याचेसोबत संगनमत करुन

स्टॅन्डर्ड चार्टर्ड बॅंक, सिव्हील लाईन येथून इंडीया पेट्रोकेमिकल या नावाने १ करोड ६५ लाख रुपये व नरेंद्र ऑईल एजेन्सी नावाने ४ करोड रुपये असे एकुण ५ करोड ६५ लाख रुपये कर्ज सन २०२१ मध्ये मयत झालेला इसम नामे नरेंद्र पुणेकर याचे नावाने बनावट स्वाक्षरी करुन व कागदपत्रे सादर करुन ती खरी आहेत, असे भासवुन आरोपी क्र. ५ चे मदतीने कर्ज मंजुर करुन घेतले आरोपींनी बॅंकेची दिशाभुल करुन मृतक व्यक्तीचे नावे एकुण ५ करोड ६५ लाख रुपये कर्ज मंजुर करून अन्यायाने विश्वासघात करून बॅंकेची फसवणुक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे पोउपनि. सोनवणे ८३०८५२९५९७ यांनी आरोपींविरूध्द कलम ४२०,४६५,४६७,४६८,४७१,१२०ब भादंवि अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**